# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

महात्मा जोतिराव फुले यांनी महाराष्ट्रात प्रतिकूल परिस्थितीमध्ये केलेले समाज-प्रबोधनाचे कार्य एक प्रकारचे अग्निदिव्यच होते. समाजाने मान्य केलेल्या हजारो वर्षे चालत आलेल्या रुढी परंपरा मोडून काढणे म्हणजे सुताने स्वर्गाला जाण्याचाच प्रकार होता. वास्तविक आपण हाती घेतलेले कार्य अत्यंत अवघड आहे याची जाणीव फुले यांना असावी तरीही त्याशिवाय शूद्रातिशूद्र दास्यमुक्त होणार नाहीत याची खात्रीही त्यांना होती. म्हणूनच त्यांनी हे व्रत धारण करुन तळागाळातील शूद्रातिशूद्रांच्या मुक्ततेसाठी जणू आयुष्यभर खडतर तपश्चर्याच केली अर्थात त्यांच्या या तपश्चर्येला म्हणावे तितके यश लाभले नाही. अंत:करणावर बिंबलेल्या आणि मनात रुजविलेल्या रुढी परंपरा सोडायला समाज तितकासा तयार नव्हता. तरीही फुले आपल्या ध्येयापासून थोडेही ढळले नाहीत. त्यांनी अनंत यातना, छळ सहन करुन रुढी-प्रामाण्याविरुध्द बंडाचे निशाण रोवले म्हणूनच 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' फुले यांना " हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीच्या विरुध्द बंड पुकारणारा पहिला पुरुष" म्हणतात. जोतिराव फुले यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले होते. भटशाहीत खितपत पडलेल्या शूद्र बांधवांबाबत त्यांच्या मनात कळकळ निर्माण झाला होताच शिवाय उच्चवर्णीयांनी पुरोहितशाही आणि अधिकारशाहीच्या बळावर खुद्द फुले यांच्या घराण्यातील पणजोबापासूनचा मांडलेला छळ सहन केला होता. एका ब्राह्मण मित्राच्या लग्नात जोतिरावांचा शूद्र म्हणून घोर अपमान करण्यात आला होता. समाजात स्त्रियांची सर्व बाजूनी अवहेलना केली जात होती. जोतिरावांना या सर्वघडामोडीतून शूद्र बांधवाना बंधमुक्त करणे या ध्येयाचा साक्षात्कार झाला.

ब्राह्मणांचा बालेकिल्ला असलेल्या पुण्यात जोतिरावांच्या आचरण, शिकवणूक व विचारसरणीमुळे संतापाची लाट निर्माण झाली. जोतिराव फुले यांची मते धर्मद्रोही व भ्रष्टाचारी आहेत अशी सनातनी ब्राह्मणांची समजूत झाली. म्हणूनच त्यांनी ध्येयाने प्रेरित झालेल्या जोतिराव फुले यांची समाजात टिंगल-टवाळी सुरु केली. ब्राह्मणांच्या दबावामुळे फुले पती-पत्नीस गृहत्याग करावा लागला, त्यांना ध्येयापासून विचलित करण्यासाठी काही समाजकंटकांनी त्यांच्यावर चिखलफेक, दगडफेक केली. प्रतिगामी मंडळी पैकी काही माथेफिरुंनी मारेकरी घालून जोतिरावांच्या आयुष्याचा शेवट करण्याचे ठरविले पण या ' प्राणावरील संकटातूनही ' जोतिराव बचावले या सर्व प्रकारच्या यातना, कष्ट सहनकरीत जोतिराव आपले कार्य तितक्याच जोमाने करीत होते. आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी दोन प्रकारच्या तंत्राचा अवलंब केला. (१) सभा-व्याख्याने व वाङ्मयनिर्मितीच्या माध्यमातून जनजागृती करणे, (२) आपल्या उक्तीप्रमाणे कृती करुन दाखविणे या तंत्राचा अवलंब करुन फुले यांनी आयुष्यभर आपले कार्य अखंडपणे चालविले.

महात्मा जोतिराव फुले यांनी सर्व प्रथम पुण्यात ठिकठिकाणी सभा घेतल्या, समाजातील शूद्रातिशूद्रांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करुन दिली. तळागाळातील सामान्य-जनांना फुले यांची विचारसरणी पटलेली होती. आपणास शूद्र बांधवाकडून प्रतिसाद मिळतो आहे याची खात्री होताच त्यांनी आपले सभा, व्याख्यानांचे कार्य अधिक जोमाने व गतीने सुरु केले.' जोतिराव फुले यांनी मुंबई, ठाणे व बडोदे वगैरे भागात दौरे काढून सत्यशोधक समाजाच्या संबंधी व्याख्याने दिली आणि प्रचार केला[१]. तुकारामादि संतानी ज्याप्रमाणे खेडोपाडी कथा - कीर्तनाच्या माध्यमाने अध्यात्मिक उध्दाराचे कार्य केले त्याच प्रमाणे म.फुले यांनी ' सत्यशोधक ' जलशांच्या रुपाने शूद्रातिशूद्रांचा स्वाभिमान जागृत केला. सभा - व्याख्याना - बरोबरच जोतिराव फुले यांनी गद्य, पद्यादि वाङ्मय निर्मितीतून समाजातील ढोंगबाजीवर परखड टीका करुन शूद्रातिशूद्रांमध्ये प्रबोधनाचे नवचैतन्य निर्माण केले.

जोतिराव फुले यांच्या वाङ्मय निर्मितीचा कालखंड साधारणपणे १८५५ ते १८९० पर्यन्त मानला जातो. त्यांनी १८५५ मध्ये ' तृतीयरत्न ' नावाचे एक नाटक लिहून

ब्राह्मणांची भोंदूगिरी उघडी पाडली. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीमधून समाज प्रबोधनवादी ,तत्वप्रणाली प्रकर्षाने जाणवते' ब्राह्मणांचे कसब ' हा काव्य ग्रंथ लिहिण्यामागील उद्देश जोतिराव स्पष्टपणे मांडतात' भटशाहीत खितपत पडलेल्या शूद्रबांधवांना बंधमुक्त करणे, विद्या शिकून सुधारण्याची त्यांना प्रेरणा देणे असा आपला माणस' ब्राह्मणाचे कसब' लिहिण्यामागे आहे'[2] गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, सत्सार अंक १ व २ या व्दारे समाजातील शेतकरी,कामकरी, शूद्रातिशूद्रांना स्वत्वाची जाणीव करुन दिलीच शिवाय' सार्वजनिक सत्य धर्माच्या रुपाने सर्वसमाजासाठी आधुनिक व आदर्श आचारसंहिता तयार केली.'सार्वजनिक - सत्यधर्म'हा जणू फुले-कृत अत्याधुनिक धर्मग्रंथच' म्हणावा लागेल. परशुराम तात्या पडवळ यांनी लिहिलेला' जातिभेद विवेकसार' हा ग्रंथ उच्चवर्णीयांच्या दबावामुळे प्रकाशित करण्याचे त्यांचे धैर्य नव्हते पण फुले यांनी स्वत:च्या नावावर तो प्रकाशित करुन, येणाऱ्या प्रत्येक संकटास कवटाळण्यासाठी ते धैर्याने उभे राहिले. छ.शिवाजीराजे भोसलेंचा पोवाडा लिहून जोतिराव आधुनिक युगातील शिवप्रभूंचे पहिले शाहीर ठरले असे वि.व. घाटे अभिमानाने म्हणतात.

जोतिरावांनी अखंडादि काव्यरचनेतून बुरसटलेल्या रुढी,शब्दप्रामाण्य, प्रारब्धवाद,भ्रामक अंधश्रध्दा इत्यादींवर भेदक प्रहार करुन बहुजन समाजाला जागे केले. हे त्यांचे कार्य ऐतिहासिक दृष्ट्या मोलाचे आहे ते पार-पडण्यासाठीच साधन म्हणून त्यांनी काव्याचा वापर केला. अखंडादि काव्य रचनेत प्रामुख्याने ब्राह्मण्यावर परखड टीका आढळते. म्हणून त्यांना' ब्राह्मणद्वेष्टे ' म्हटले जाते पण फुले खऱ्या अर्थाने ' ब्राह्मण ' या विशिष्ट जातीचे विरोधक नव्हते तर ते चातुर्वर्ण्याविरुध्द होते ,जन्म जात, उच्चनीचतेच्या विरुध्द होते या विषम समाजपध्दतीचे निर्माते व नेते ' ब्राह्मण' होते म्हणून फुलेंच्यांच्या विरुध्द विशेष रोष होता[3] ब्राह्मण्यावर भेदक प्रहार करणाऱ्या फुलेंच्यांचे लोकहितवादी सारखे अनेक ब्राह्मण सहकारी होते. त्यांनी ' प्रभाकर' पत्रात' लोकहितवादी' या टोपण नावाने आपली इतिहास प्रसिध्द लेख-मालिका प्रामुख्याने ब्राह्मण जातीला उद्देशूनच लिहिली होती.[4] या लेखमालिकेतुन त्यांनी पुरोहितशाहीवर परखड टीका केली व सामान्य शूद्रातिशूद्रांना त्यांच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

मानवी हक्कांची जाणीव करुन दिली. जोतिरावांचे त्यांच्या ब्राह्मण सहकाऱ्याशी काही वेळा मतभेद होत असत.अशावेळी ते त्यांच्यावर तिखट शैलीत टीका करीत. न्या.रानडेही त्यांच्या टीकेला बळी पडले होते पण वाद तात्त्विक स्वरुपाचा होता. ब्राह्मणजातीबाबत त्यांच्या मनात रोष कधीच नव्हता.' विष्णूशास्त्री चिपळूणकरांसारख्या आपल्या कट्टर व निष्ठूर विरोधकाचे तरणेबांड शिष्य टिळक व आगरकर यांच्यावर सरकारी रोष होऊन त्यांना कारावासाची शिक्षा झाली, तेव्हा या उद्योन्मुख होतकरु तरुणांचे जाहीर स्वागत व कौतुक करायला जोतिराव फुलेच स्वत: पुढे आले.[5] अर्थात फुलेंच्या मनात ब्राह्मण' या विशिष्ट जातीबाबत रोष नव्हता पण त्यांनी स्त्री-शुद्रातिशुद्रांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने ब्राह्मणांच्या नेतृत्वावर व ब्राह्मण्यावर जरुर टीका केली आहे. या टीकेपाठीमागे शुद्रातिशुद्रांची दास्यमुक्तता या व्यतिरिक्त त्यांचा कोणताही हेतू नव्हता. परंतु ही टीका थोडीशी अती झाली असल्याचे काही पांढरपेशा वर्गास वाटते पण शुद्रातिशुद्रावरील अन्याय,अत्याचाराचा विचार करता ती तितकीशी अन्यायी वाटत नाही.

जोतिराव फुल्यांनी सभा,व्याख्याने,साहित्यनिर्मिती या बरोबरच प्रत्यक्ष समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेतले होते. पोपटपंची अथवा कोरडे पांडित्य त्यांना मान्य नव्हते. ते कृतिशूर समाजसुधारक असून त्यांची कर्तृत्वशक्ती अफाट होती, शिवाय ते उत्कृष्ट संघटक होते. सर्व प्रथम त्यांनी स्त्रिया आणि शुद्रातिशुद्रांना साक्षर बनविण्यासाठी शैक्षणिक कार्य हाती घेतले. इ.स. १८४८ मधील ऑगस्ट महिन्याच्या आसपास बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात कनिष्ट वर्गातील मुलींसाठी शाळा सुरु केली. यामुळे पुण्यातील उच्चवर्णीयांनी खूपच आकांडतांडव केले. ' जोतिबांचे शैक्षणिक कार्य हा हिंदुधर्मावर रानटी हल्ला आहे' असे पुण्यातील सनातनी ब्राह्मणांना वाटले, त्यामुळे या पुण्यनगरीस भयंकर कलंक लागला असे त्यांनी मानले.[6] जोतिरावांनी हाती घेतलेल्या शैक्षणिक कार्याच्या सिध्दीसाठी त्यांना अनंत अडचणी आल्या पण त्यांनी इ.स.१८४८ ते १८५२ या चार वर्षात एकूण १८ शाळा काढल्या यातूनच त्यांची ध्येयवादी कृतिशूर कर्तृत्वशक्तीची गरुड झेप जाणवते. तत्कालीन इंग्रज

सरकारने फुले यांचे शैक्षणिक कार्य पाहून सत्कार केला ' मेजर कॅन्डी ' त्यांच्या शाळेला पुस्तके पुरवीत असत. त्यांच्या शाळामध्ये अनेक ब्राह्मण शिक्षकही काम करीत होते हे एक वैशिष्ट्यच होते. जोतिरावांनी स्त्रियांना व शूद्रातिशूद्रांना जवळजवळ तीन हजार वर्षांच्या कालखंडानंतर प्रथमच ज्ञानाची कवाडे उघडून दिली ही आश्चर्यकारक क्रांती घडविणारे जोतिबा हे पहिले भारतीय होत. जोतिरावांनी शैक्षणिक कार्याबरोबर स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ सुरु केली. विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रचार केला अनेक विवाह घडवून आणले. त्याचप्रमाणे अनैतिक संबंधातून विधवा स्त्रियांच्या पोटी जन्मणाऱ्या बालकांच्या संगोपणासाठी फुल्यांनी इ.स. १८६३ साली एक वैशिष्ट्यपूर्ण बालहत्या प्रतिबंधक गृह ' नावाची संस्था स्थापन केली. भारतात अशा स्वरुपाची ती पहिलीच संस्था होती. या संस्थेमुळे त्यावेळी पुण्यातील ३०-४० निरापराध अर्भकांना अभयदान मिळाले. पुढे ती संस्था विकसित झाली. लालशंकर-उमीशंकर या सारख्या लोकांनी या संस्थेची कार्यपरंपरा पुढे चालवली.

समाजात समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व प्रस्थापित होण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी ६० कार्यकर्त्यांच्या समवेत ' सत्यशोधक समाजा ' ची स्थापना केली. जातिभेदनिर्मुलन शूद्रातिशूद्रांमध्ये शिक्षणप्रसार, ब्राह्मण्याचे समूळ उच्चाटन व ब्राह्मणेतरांसाठी सरकारी नोकऱ्या इत्यादी सत्यशोधक समाजाची प्रमुख उद्दिष्टे होती. जोतिराव फुल्यांना हळूहळू ' सत्यशोधक समाजीयन ' म्हणून अनेक कार्यकर्ते लाभले. स्त्री-शूद्रांच्या उध्दाराबरोबरच समाजातील कनिष्ठवर्ग, शेतकरी, कामगार यांच्या उध्दाराचेही काम केले. दीनदलितांच्या उध्दारासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या जोतिराव फुल्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन खऱ्या अर्थाने ' मांडवी ' येथील कोळीवाडा सभागृहात दि. ११ मे १८८८ रोजी झाले. जोतिरावांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आलेल्या असंख्य लोकांनी गगनभेदी टाळ्यांच्या कडकडाटात जोतिरावांना स्वयंस्फूर्तीने ' महात्मा ' ही दुर्मिळ व महान पदवी बहाल केली. समाजातील शूद्रातिशूद्रांच्या उध्दारासाठी संपूर्ण आयुष्य खडतरपणे खर्च करणाऱ्या जोतिरावांना नियतीची दृष्ट लागली.

पाहता उंदीर नेतसे बोका ।<br>
तैसा काळ नेतसे लोका ॥

या उक्तीप्रमाणे जोतिरावांना त्यांच्या सत्कार समारंभानंतर अवघ्या दोन वर्षात आपणावर झडप मारु पाहणाऱ्या 'काळा' ची जाणीव झाली. दरम्यान त्यांना अर्धांगवायूचा विकार झाला. आयुष्यभर मानसिक यातना सहन करणाऱ्या जोतिरावांना जीवनाच्या उत्तरार्धात शारीरिक यातना सहन कराव्या लागल्या, त्यांची प्रकृती चिंताजनक होऊन अंत समीप आला आहे अशी चिन्हे दिसू लागली. त्यांनी रुग्णशय्येजवळ आपल्या नातलगांना बोलावून घेतले, असंख्य अनुयायी त्यांना भेटण्यासाठी येत होतेच जोतिरावांनी सर्वांना उपदेश केला. 'कनिष्ठ वर्गाच्या उध्दाराचे काम नेटाने चालू ठेवा. ज्यांनी त्यांनी आपली कर्तव्ये नीतीने व निर्लोभाने करावीत' असा त्यांनी सर्वांना उपदेश केला. जोतिरावांनी आपले डोळे बंद करुन शांतपणे, हसतमुखाने २८ नोव्हेंबर १८९० रोजी रात्री दोन वाजून वीस मिनीटांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. महाराष्ट्रातील मानव्याची मंगल ज्योत लोप पावली.

जोतिरावांच्या मृत्युनंतर छ.शाहू महाराज, रामय्या व्यंकय्या-आय्यावारु, 'भास्करराव जाधव', 'भाऊराव पाटील', 'केशवराव जेधे आणि 'दिनकरराव जवळकर' यांनी जोतिबांचे कार्य पुढे चालविले पण बदलत्या कालखंडानुरुप समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत एकेक नवी विकृती निर्माण होऊ लागली. जोतिरावां-सारख्या सर्वस्पर्शी, सर्वसाक्षी, करड्या नेतृत्वाचा अभाव जाणवत होता. अर्थातच अस्पृश्य आणि त्यांच्याबरोबरच आदिवासी शुद्रातिशूद्र पुन्हा एकवेळ उपेक्षेच्या अंधारात फेकले गेले याच दरम्यान इ.स.१८९६-९७ मध्ये प्लेगाच्या धुमाकुळीत सत्यशोधक समाजीयन लोकांची पांगापांग झाली. अर्थातच पुणे येथील सत्यशोधक समाजाचे काम बंद पडले.[7] पुढे पुण्याच्या बळवंतराव कोल्हेआदी मंडळींचा उत्साह वाढला व त्यांनी प्रयत्न करुन पुनर्घटित सत्यशोधक समाजाची पहिली परिषद पुण्यास भरविली, कोल्हापूरात भास्करराव जाधवांचे अध्यक्षतेखाली 'कोल्हापूर शाहू सत्यशोधक समाजाची' स्थापना झाली. त्यांचेच मार्गदर्शनाखाली धार्मिकविधिसाठी 'घरचा पुरोहित' हे पुस्तक व लग्नासाठी कांही पत्रके तयार करण्यात आली. कोल्हापूरात सत्यशोधक समाजाच्या वाढदिवसानिमित्त ग्रामजोश्याविरहित मराठ्यांचे २०० विवाह सत्यशोधक पध्दतीने संपन्न झाले. अर्थातच पुण्यानंतर कोल्हापूर हा सत्यशोधक समाजाच्या कार्याचा

केन्द्रबिंदू ठरला सत्यशोधक समाजीयांनी खेडोपाडी जलशाच्या रुपाने परंपरागत ब्राह्मणी वर्चस्वाचे ग्रामीण विभागातून उच्चाटन करण्याचे ऐतिहासिक कार्य काही दिवस केले पण या कार्याचे सातत्य फार काळ टिकले नाही.

जोतिराव फुल्यांच्या मृत्युनंतर हळुहळू एकप्रकारचा नवा कालखंड सुरु झाला. यामुळे फुल्यांच्या मूळ प्रेरणांचा विपर्यास होऊ लागला पण कर्मवीर भाऊराव पाटलांसारख्या जोतिराव फुल्यांच्या शिष्यांनी शैक्षणिक कार्याची परंपरा अखंडपणे पुढे चालविली. पंजाबराव देशमुख सारख्यांनी शिक्षणसंस्थाचे प्रचंड मोठे जाळे जिल्ह्या-जिल्ह्यात तयार केले. पुढे अनेक शिक्षण संस्थापक उदयास आले पण शिक्षणाचा दर्जा घसरला व शिक्षण संस्थांना व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले.

जोतिराव फुल्यांनी ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरुध्द ऐतिहासिक लढा पुकारला होता. अखंडादि काव्यरचनेतून या संघर्षाचा आवेश प्रकर्षाने जाणवतो. समाजातील शुद्रातिशुद्रांना व स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करुन देऊन उच्चवर्णीयांचे पौराहित्य, ब्राह्मण्य समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी अविरत कष्ट घेतले. खेड्यापाड्यातील सर्वसामान्य लोकांपर्यन्त आपले विचार पोहोचावेत म्हणून जोतिराव फुल्यांनी अभंगाच्या धरतीची अत्यंत साधीसोपी पद्यरचना केली. जे पटले ते अब्राह्मणी, ग्राम्य भाषेत व्यक्त केले. सामान्य निरक्षर लोकांना ते सहज पाठ करता यावे या उद्देशाने अखंडातील पद्यरचना अत्यंत सोपी केली. अखंडादि काव्यरचनेतील जोतिराव फुल्यांचे विचार उदात्त आणि शाश्वत मानवी मूल्यांनी भारलेले आहेत. त्यांच्या भाषाशैलीत जळजळीत भावनांचा आवेश भरला आहे. उदा.--

ब्राह्मणांचे येथे नाही प्रयोजन ।।
द्यावे हाकलून जोती म्हणे ।।

किंवा

अशा ब्राह्मणांनी बट्टा मानवास ।
आणिला तो त्रास ।। जोति म्हणे ।।

अखंडादि काव्यातील धगधगत्या संतापाबरोबर अश्लिल, शिव्याशापांचा समावेशही आढळतो. त्यांच्या भाषेत ओबडधोबडपणा व अश्लीलता, ग्राम्यता समाविष्ट झाल्याने त्यांचे काव्यलेखन सुशिक्षित वर्गात प्रतिष्ठा पावू शकले नाही पण जोतिराव फुल्यांचे काव्य एक ' रानफळ ' आहे ते रसाळ नाही पण त्यामध्ये औषधी गुणधर्म आहेत हे 'आण्णासो डांगे' यांचे मत सार्थ वाटते.

जोतिरावांची कविता पददलितांच्या दु:खाचा आर्तहुंकार होताना दिसते तर कधी उपेक्षितांच्या संघटनेचे ती रणशिंग होते --

उदा. विव्दान शूद्रांनो जागे कां रे व्हाना ।
तपासोनी पहाना ।। ब्राह्मघोळ ।
व्दिजकूट तुम्ही आणावे मैदानी ।
आली ही पर्वणी जोती सांगे ।।

त्यांचे काव्य काही वेळा शिरजोर झालेल्या भटशाहीवर तुटून पडते, तर कधी भोंदूपणावर सपासप वार करते. त्यांचे अखंडादि काव्य जितके लोभस, लडीवाळ, मृदू हळुवार तितकेच भेदक, धारदार, आक्रमक , पल्लेदार आहे. सुहृदयवाचकाला अस्वस्थ करणारे, मायमराठीला जोतिरावांनी अर्पण केलेले ते ज्वलंत अनमोल शब्दशिल्प होय. सत्यशोधक जलशातील लोकांना पाठांतराच्या दृष्टीने अत्यंत सोईस्कर अशी ही ' अखंडरचना ' होय. जोतिरावांनी अखंडादि काव्यरचनेव्दारे आपली समाजप्रबोधनवादी विचारसरणी आणि सत्याचरणाबाबतची तत्वप्रणाली ज्वलंतपणे मांडली.

जेधे-जवळकर आणि त्यांच्या सत्कार्यांनी ब्राह्मणीवर्चस्वाविरुध्द लढा धडाडीने पुढे चालविला तर डॉ.बाबासो आंबेडकरांनी शूद्रातिशूद्रांच्या उद्धारासाठी जोतिराव फुल्यांकडून स्फूर्ती घेतली होती. त्यांना अस्पृश्यांच्या मुक्ततेसाठी सवर्णां - विरुध्द प्रचंडमोठा संघर्ष उभा करावा लागला. जोतिराव फुल्यांच्या विचारसरणीमुळे व तत्वप्रणालीमुळे स्त्रिया व शूद्रातिशूद्र साक्षर झाले. त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची जाणीव झाली. साक्षरतेचे महत्त्व पटवून सांगताना फुले म्हणतात --

UNIVERSITY LIBRARY ...APUR

मानव पदाची जरा लाज धरा ।।
विव्दान तो करा ।। मुली मुले ।।
गिर्वाणी शिकता क्षेल तुम्हाला ।।
आठवाल बोला । माझ्या तुम्ही ।।[8]

शुद्रातिशुद्रांच्या सर्वांगीण विकास शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही हा आत्मविश्वास फुल्यांना होता. म्हणूनच त्यांनी शुद्रांच्या साक्षरतेकडे विशेष लक्ष दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख यासारख्यांनी जोतिराव फुल्यांच्या शैक्षणिक कार्याची परंपरा पुढे यशस्वीपणे चालविली पण दिवसेंदिवस शिक्षणाचा दर्जा घसरतो आहे ही एक खंत मनात राहून जाते.

स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य धोंडो केशव कर्वे या सारख्यांनी हाती घेतले पण ते ठराविक वर्गापुरतेच मर्यादित ठेवले .स्त्री-मुक्ती चळवळ अनेक शतकापासून सुरु आहे पण अद्याप स्त्री-पूर्णांशाने मुक्त होऊ शकत नाही.' रुपकंवर' सारख्या निरापराध विधवांना सती जावे लागते. विधवांच्या पुनर्विवाहाचे धैर्य अद्याप कुणामध्येही आलेले नाही. विवाहप्रसंगी पुरोहितांची दलाली अद्याप सुरु आहे. वास्तूशांती, ग्रहपिडा, पूजाविधिचे स्तोम राजरोसपणे सुरु आहे. सधन मराठा समाजातील कांही लोक आपल्या सधनतेचा विधायक कार्यासाठी वापर करण्याऐवजी आपल्या प्रतिष्ठेचा व दांभिकतेचा डौल दाखवितात व बारश्यापासून ते बाराव्यापर्यन्त विविध धार्मिक विधिसाठी जोतिराव फुल्यांचे नाव घेत घेत पुरोहितांना बोलावून हजारो रुपये खर्च करतात .वास्तविक बहुजन समाजातील सधन मंडळीचे आजचे वर्तन म.जोतिबा फुल्यांच्या तत्वज्ञानाचा पराभव करणारे दिसून येते. सुशिक्षितांमधील बुध्दिप्रामाण्यवाद तपासून पहावा की काय अशी परिस्थिती आली आहे. फुल्यांच्या तत्वज्ञानांचा सातत्याने पाठपुरावा न केल्याचा हा परिणाम आहे. जर समाजात पूर्ववत पौराहित्य व ब्राह्मण्य सुरु होणार असेल तर जोतिरावांची खडतर तपश्चर्या व वर्णवर्चस्वाविरुध्दचा प्रचंड मोठा ऐतिहासिक संघर्ष अर्थशून्य ठरतो की काय ? अशी खंत व भीती निर्माण होते. 'या अधोगतीस राजकर्ते ,नोकर,अधिकारी व सामान्यजनता सर्वजणच जबाबदार आहेत हे मान्य करुन महात्मा फुले यांच्या विचाराप्रमाणे प्रत्यक्ष प्रामाणिकपणे वर्तन केले

पाहिजे[९]. माझ्यासारख्या बहुजन समाजातील मागासलेल्या ग्रामीण भागातील एका सामान्य विद्यार्थ्याने फुल्यांच्या अखंडादि काव्यातील विचार व तत्वप्रणाली शोधनिबंधाच्या रुपाने विद्यापीठास सादर करणे म्हणजे त्यांच्या महान कर्तृत्वाची सर्व समाजास जाणीव करुन देवून त्यांच्यात नवचैतन्य व परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा निर्माण करुन देण्याचा अल्पसा पण यशस्वी प्रयत्न म्हणावा लागेल.

••

## संदर्भ सूची


१ प्रा.मो.नि.ठोके — वास्तव आणि दृष्टिदीप
प्रथमावृत्ती, बेळगांव, जाने., १९८८, पृ.२८

२ 'अस्मितादर्श' — दिवाळी अंक १९७४, पृ.३९

३ प्रभाकर वैद्य — महात्मा फुले आणि त्यांची परंपरा
(प्रेरणा - शिकवण - विपर्यास)
प्रथमावृत्ती, मुंबई, ऑक्टोबर १९७४, पृ.२०

४ धनंजय कीर — म.जोतिराव फुले
आ.२,री, मुंबई १९७३, पृ.२५

५ प्रभाकर वैद्य — उनि - पृ.२६

६ धनंजय कीर — उनि - पृ.३०

७ 'मानस' वासंतिक अंक - १९८४ - पृ.२२

८ धनंजय कीर, स.ग.मालशे (संपा.) — महात्माफुले समग्र वाङ्मय
प्रथमावृत्ती, मुंबई १९६९, पृ.४९७

९ प्रा.मो.नि.ठोके — उनि - पृ.२९


••